**लातूर जिल्हयातील लातूर, रेणापूर व देवणी या तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटांकरीता (एकूण ०५ ) दि. ३१/०८/२०२० रोजी सकाळी ११:३० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पर्याविषयक जाहिर लोकसुनावणी इतिवृत्त.**

लातूर जिल्हयातील खालील तक्त्यात नमूद केलेल्या लातूर, रेणापूर व देवणी या तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटांकरीता (एकूण ०५) पर्याविषयक जाहिर लोकसुनावणी दि. ३१/०८/२०२० रोजी सकाळी ११:३० वाजता जिल्हाधिकारी, कार्यालय लातूर येथून Webex App द्वारे घेण्यात आली.

| अ.क्र. | प्रस्तावीत वाळूघाटांची ठिकाणे | वाळूघाटांची संख्या | तालुका |
|---|---|---|---|
| १. | मौ. सलगरा, मौ. उमरगा, | ०२ | लातूर |
| २. | मौ. आंदलगाव, | ०१ | रेणापूर |
| ३. | मौ. बटनपूर, मौ. गौंडगाव | ०२ | देवणी |

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. बी.ओ/जेडी (डब्ल्युपीसी)/पीएच/बी- 200824-FTS-0050 dtd. 24/08/2020 अन्वये सदरच्या लोकसुनावणीसाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

१. जिल्हाधिकारी लातूर किंवा त्यांचे प्रतिनिधी अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांचेपेक्षा कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष
२. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद - सदस्य
३. उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर - समन्वयक

सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी खालील अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे उपस्थित होते.

१. मा. अपर जिल्हाधिकारी, लातूर
२. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद (Webex App द्वारे)
३. प्र. जिल्हाखनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
४. उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर

श्री. व्हि. पी. शेळके, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनवणी समितीचे अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर, प्र. जिल्हाखनिकर्म अधिकारी, लातूर, तसेच, Webex App. द्वारे उपस्थित असलेले प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद व Webex App. द्वारे सहभाग घेतलेल्या नागरिकांचे स्वागत केले. तसेच, समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सुरू करण्यात आली.

सर्वप्रथम श्री. व्ही. पी. शेळके, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. १४/०९/२००६ व सुधारीत दि. ०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

लातूर जिल्हयातील ०५ वाळू घाटांमधून वाळूचा उपसा करण्याकरीता प्रकल्प प्रवर्तक, जिल्हा खनिकर्म अधिकारी, लातूर यांनी दि. २१/०७/२०२० रोजी रीतसर शुल्क भरून EMP. Executive Summary या कागदपत्रासह महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक श्री. व्ही. पी. शेळके, यांनी नमूद केले की, केंद्र शासनाच्या खनिकर्म विभागाने मार्च २०१८ मध्ये Sand Mining Frame Work, 2018 प्रसिद्ध केलेले आहे. त्यामध्ये वाळू/रेती निर्गती करताना आवश्यक असणाऱ्या बाबीं संदर्भात देशातील काही ठळक राज्यांचा अभ्यास करून काही दिशा निर्देशक दिलेले आहेत. तसेच, मा. राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) यांना ओ. ए. नं. ३८६/२०१५ मध्ये दिनांक १९/०९/२०१८ रोजीच्या ओदशानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या समन्वय साधून Sustanable Sand Mining Guidelines, 2016 व Sand Mining Frame Work, 2018 नुसार धोरणात अनुकूल बदल करण्याचे व जनसुनावणी घेण्याचे निर्देश पारित केलेले आहेत. तसेय, पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या दि. ०३/१२/२०१९ च्या पत्राद्वारे वाळूघाट प्रकल्पास पुर्व पर्यावरण अनुमती मिळणेकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे नमूद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीच्या मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा व त्या अनुषंगाने कायदे या बाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांच्या विचार करणे.

म.प्र.नि. मंडळाकडे प्राप्त लोकसुनावणी घेण्याबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने मा. अपर जिल्हाधिकारी, लातूर यांच्या परवानगीने दि. ३१/०८/२०२० रोजी लातूर जिल्हयातील वाळू घाटांबाबत पर्यावरण विषयक लोकसुनावणी घेण्याबाबत दिनांक निश्चित करण्यात आली होती. या बाबत नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि. २८/०७/२०२० रोजीच्या मराठी दैनिक सकाळ व इंग्रजी टाईम्स ऑफ इंडिया मध्ये सदरच्या लोकसुनावणीबाबतच्या सुचना प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. तसेच, अधिसुचनेप्रमाणे वाळू घाटांसंबंधीचे ठळक वैशिष्ट असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्यां प्रारूप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती मराठी व इंग्रजीत शासनाच्या खालील कार्यालयामध्ये इच्छूक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
२. जिल्हा उद्योग केंद्र, लातूर
३. जिल्हा परिषद कार्यालय, लातूर
४. तहसिल कार्यालय, लातूर, रेणापूर व देवणी
५. ग्रामपंचायत कार्यालय-ता. लातूर - मौ. सलगरा, मौ. उमरगा, ता. रेणापूर - मौ. आंदलगाव , ता. देवणी - मौ. बटनपूर, मौ. गौंडगाव
६. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद.
७. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३ रा मजला सायन (पूर्व), मुंबइ - ४०००२२.
८. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
९. पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट विंग, नविन सचिवालय, इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४०००१.

परंतू कोरोना प्रादूर्भावाच्या शासनाने लॉकडाउन घोषित केल्याने सदरची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी ही वैज्ञानिक, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन तथा सचिव, राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकन समिती - १ यांनी त्यांच्या पत्र क्र. SEAC/ 2016 प्र.क्र.1/ ता.क्र. 03 दि. 04/05/2020 अन्वये सध्या सुरू असलेल्या कोविड- १९ विषाणूच्या उद्रेकामुळे राज्यात शासनातर्फे करण्यात आलेलया लॉकडाउनमुळे सदरील जाहिर लोकसुनावणी ही Webex App. द्वारे घेण्याबाबत सुचित केले होते. त्या अनुषंगाने सदर लोकसुनावणी ही Webex App. द्वारे घेण्यात येत आहे.

...२...

तद्नंतर लातूर जिल्हयातील ०५ वाळूघाटांबाबत प्रकल्प प्रवर्तक यांचे तांत्रिक सल्लागार श्री. प्रशिल शुक्ला, यांनी सादरीकरण केले. तसेच, वाळू उपसा करताना प्रदूषण नियंत्रणाबाबत घेण्यात येणाऱ्या उपाय योजना बाबत माहिती दिली.

सादरीकरणा नंतर श्री. व्ही. पी. शेळके, समन्वयक यांनी असे सांगितले की, आतापर्यंत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, लातूर येथे सदरील वाळूघाटांबाबत एकही लेखी निवेदन/सुझाव/आक्षेप प्राप्त झालेले नाही. तसेच, या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीमध्ये Webex App. द्वारे सहभागी झालेल्या नागरिकांना विनंती केली की, सदरील वाळूघाटांबाबत त्यांचे मत, टिका टिपण्णी, आक्षेप मांडण्या बाबत विनंती केली.

उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १. | श्री. पी. एम. जोशी , प्रादेशिक अधिकारी औरंगाबाद यांनी विचारले की पर्यावरण व्यवस्थापन अहवालानुसार (EMP) वातावरणातील हवेची गुणवत्ता ही दर १५ दिवसांनी घेतली जाईल असे म्हटले आहे. परंतू ती केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रोटोकॉल नुसार असणे गरजेचे आहे. तथापी, तसे दिसत नाही. | प्रशिल शुक्ला, तांत्रिक सल्लागार यांनी असे सांगितले की, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या हवा गुणवत्ता चाचणी मार्गदर्शक तत्वानुसार हवेची गुणवत्ता चाचणी करण्यात येईल, त्यासाठी प्रस्तावीत निधी वाळू कंत्राटदार द्वारे खर्च करण्याचे प्रस्तावीत आहे. |
| | तद्नंतर, सांगितले की, प्रस्तावित वृक्षारोपण योजना ही पर्यावरण व्यवस्थापन अहवालाचा (EMP) एक भाग आहे आणि तो जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर ऐवजी वाळूघाट कंत्राटदार यांचेकडून आमलात आणला जावा. | प्रशिल शुक्ला, तांत्रिक सल्लागार यांनी असे सांगितले की, वाळू घाटाच्या नदी किनाऱ्यावर वृक्षारोपण करण्यात येईल तसेच, वाळू वाहतूकीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस वृक्षारोपण करण्यात येईल. त्यासाठी प्रस्तावीत निधी वाळू कंत्राटदार द्वारे खर्च करण्याचे प्रस्तावीत आहे. |

तद्नंतर अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांनी Webex App. द्वारे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीमध्ये सहभागी झालेल्या नागरिकांना अवाहन केले की, जर कोणाला सदरील वाळूघाटांबाबत पर्यावरण विषयक प्रश्न/ आक्षेप/ सुचना असतील तर त्यांनी मांडावेत असे सांगितले. तसेच, सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद यांनी सुद्धा लोकसुनावणीमध्ये सहभागी झालेल्या नागरिकांना त्यांचे काही प्रश्न/ आक्षेप/ सुचना असतील तर त्यांनी त्या मांडाव्यात.

समन्वयक, यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीमध्ये सहभागी झालेल्यांनी मांडलेल्या मुद्दयांची नोंद घेण्यात आली असल्याचे सांगितले त्यानंतर त्यांनी सर्वांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(व्ही. पी. शेळके)
समन्वयक तथा
उप प्रादेशिक अधिकारी, लातूर

(पी. एम. जोशी )
सदस्य तथा
प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद

(अरविंद लोखंडे )
अध्यक्ष तथा
अपर जिल्हाधिकारी, लातूर.